पनवेल(प्रतिनिधी) उर्दु शाळेची इमारत उभारण्यासाठी पनवेल एज्युकेशन सोसायटी संस्थेला नगरपरिषदेच्या माध्यमातून भुखंड मिळावा, अशी मागणी सोसायटीचे अध्यक्ष इब्राहीम अ.लतीफ मेटकर यांनी आमदार प्रशांत ठाकूर तसेच नगर परिषदेकडे निवेदनाव्दारे केली आहे.

पनवेल एज्युकेशन सोसायटी पनवेल ही संस्था पनवेल तालुक्यात उर्दु अल्पभाषिकांची एकमेव संस्था असून मागील ५५ वर्षापासून संस्थेअंतर्गत पनवेल, तळोजा व बारापाडा येथे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक उर्दु भाषिक शाळा चालविण्यात येत आहेत. संस्थेची पनवेल शहरात याकुब बेग प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरू आहे. त्यात एकूण २000 विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. पनवेल परिसरात नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, वडघर, कामोठे, कोनगाव, आपटा येथील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी या शाळेत शिक्षणासाठी येतात.शाळेतील दिवसेंदिवस विद्यार्थी संख्या वाढत आहे. परंतू शाळेची इमारत अपुरी पडत असल्यामुळे बरेच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास शाळा असमर्थ आहे. त्यामुळे बरीच विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. उच्च माध्यमिक शाळेत शिक्षणासाठी पनवेल शहर, पनवेल परिसर, तळोजा, बारापाडा, आपटा, कळंबोली, खोपोली येथून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. त्यात मुलींची संख्या जास्त आहे. जादा खोल्यांची सोय नसल्यामुळे बरेच विद्यार्थी आर्थिक कारणास्तव मुंबई, नवी मुंबई व कौसा, मुंब्रा येथे उच्च शिक्षणासाठी जातात. पण ज्यांची आर्थिक कुवत नाही अशा अनेक होतकरू विद्यार्थ्यांना मात्र उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे.

सर्व परिस्थिती पाहता पनवेल एज्युकेशन सोसायटी संस्था एक नवीन इमारत बांधून उच्च शिक्षणासाठी प्रयत्नशील आहे. नगरपरिषद हद्दीतील अंतिम भुखंड क्र.४५ संस्थेस दिल्यास या जागेवर सर्व सोयी सुविधा असलेली इमारत बांधून तेथे उच्च शिक्षणाची सोय करण्यात येईल. पनवेल परिसरातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण घेणे सोयीचे होईल, असे या निवेदनात म्हंटले असून या करिता सर्वत्तोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिले. यावेळी माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, ज्येष्ठ नेते गनी कच्छी, माजी नगरसेवक सिराज सय्यद उपस्थित होते.